**शासकीय /निमशासकीय सेवेत नियुक्त झालेले /होणाऱ्या अंध / क्षीणदृष्टी /कर्णबधीर व अस्थिव्यंग कर्मचाऱ्यांना सहाय्यक तंत्रज्ञान उपकरणे उपलब्ध करुन देणेबाबत.**

महाराष्ट्र शासन
**शासन निर्णय क्रमांक -अपंग- २०१२/ प्र.क्र. ३२/ अ.क. -२**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक:- ०७.१०.२०१६.

संदर्भ:- १) शासन निर्णय क्रमांक-न्यायाप्र-२०११/ प्र.क्र.४/सुधार- ३, दिनांक ३ जून,२०११
२) शासन निर्णय क्रमांक-अपंग-२०११/ प्र.क्र.९१/सुधार- ३, दिनांक २० जुलै,२०११
३) शासन निर्णय क्रमांक-अपंग-२०१२/ प्र.क्र. ३२/अ.क.२ दिनांक ३ मार्च, २०१२
४) शासन निर्णय क्रमांक-अपंग-२०१२/ प्र.क्र. ३२/अ.क.२ दिनांक ६ सप्टेंबर,२०१२
५) शासन निर्णय क्रमांक-अपंग-२०१२/प्र.क्र. ३२/अ.क.२ दिनांक २७ डिसेंबर,२०१२
६) शासन निर्णय क्रमांक-अपंग-२०१२/ प्र.क्र. ३२/अ.क.२ दिनांक १६ मे, २०१३
७) शासन निर्णय क्रमांक-अपंग-२०१२/ प्र.क्र. ३२/अ.क.२ दिनांक ३० डिसेंबर,२०१४
८) शासन निर्णय क्रमांक-अपंग-२०१२/ प्र.क्र. ३२/अ.क.२ दिनांक ८ जुलै,२०१५
९) शासन निर्णय क्रमांक-अपंग-२०१२/ प्र.क्र. ३२/अ.क.२ दिनांक ८ नोव्हेंबर,२०१५

**प्रस्तावना** :- मा. उच्च न्यायालयामध्ये प्रलंबित असलेली जनहित याचिका क्र.३२९४/२०१० च्या अनुषंगाने शासकीय/निमशासकीय सेवेतील अपंग कर्मचाऱ्यांना तातडीने विहित मुदतीत सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणांचा पुरवठा करणे बंधनकारक असल्याने वित्त विभागाच्या दिनांक १५/०५/२००९ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या खरेदीच्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्याची अट संदर्भाधीन क्र. ९ येथिल शासन निर्णयान्वये दि.३१.०३.२०१६ पर्यंत या प्रकरणांपुरती शिथील करण्यात आली होती. सदर अट आणखी काही कालावधीकरीता शिथील करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**:- शासकीय / निमशासकीय सेवेतील अपंग कर्मचाऱ्यांना सहाय्यक तंत्रज्ञान /उपकरणे उपलब्ध करुन देण्याबाबत या विभागाच्या संदर्भाधीन दि.३ जून, २०११ व दि.२० जुलै,२०११ च्या शासन निर्णयान्वये खरेदीपध्दतीचा अवलंब करण्याची अट संदर्भाधीन क्र. ९ येथिल दि.११ नोव्हेंबर,२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये दि.३१.०३.२०१६ पर्यंत शिथील करण्यात आलेली होती. **सदर अट आता दि. ३१.१२.२०१६ पर्यंत शिथील करण्यात येत आहे.** तसेच उपरोक्त दि.३ जून,२०११ व दि.२० जुलै,२०११ च्या शासन निर्णयान्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या पुरवठादारांच्या यादीसही दि. ३१.१२.२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

२) तरी प्रत्येक विभागाने त्यांच्या आस्थापनेवरील अपंग कर्मचाऱ्यांना पुरवावयाची उपकरणे त्यांच्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून उपरोक्त पुरवठादारांच्या यादीतील पुरवठादार /उत्पादक यांचेकडून थेट पध्दतीने खरेदी करावी.

३) तसेच उपरोक्त शासन निर्णय दि. ३ जून,२०११, दि.२० जुलै, २०११ व दि.८ फेब्रुवारी, २०१३ अन्वये रुपये ५०,०००/- पर्यंत जास्तीत जास्त दोन उपकरणांचा पुरवठा करण्याबाबत असलेल्या मर्यादेत संदर्भाधीन क्र. ९ येथील दि.११ नोव्हेंबर,२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये वाढ करण्यात येऊन, सदर मर्यादा **१२०० यु.एस.**

डॉलरच्या रुपयातील मुल्यापर्यंत (तथापि जास्तीत जास्त रु.१,००,०००/- अक्षरी रुपये एक लक्ष फक्त) करण्यात आलेली आहे. यासाठी सर्व विभागांनी त्यांच्या अर्थसंकल्पात तरतुद करावी.

४. सदर शासन निर्णय प्रस्तुत न्यायालयीन प्रकरणाच्या अनुषंगाने शासन सेवेतील अपंग कर्मचाऱ्यांना त्यांच्या मागणीनुसार सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे पुरविण्यासाठी पुरवठादार व त्यांचे दर निश्चित करण्याकरीता तसेच सदर उपकरणांच्या थेट खरेदी पध्दतीस मान्यता देणेबाबत मा. उच्च न्यायालयाच्या अनुमतीने स्थापन करण्यात आलेल्या तज्ञ समितीच्या अधिकारात त्या समितीच्या दिनांक १९.०७.२०१६ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून,त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१६१००७१२१०५९११२२ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

प्र.ठाकूर

( प्रफुल्ल ठाकूर )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति :-
मा. राज्यपाल यांचे सचिव,राजभवन, मलबार हिल, मुंबई,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
मा. मंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी संचिव, मंत्रालय, मुंबई,
मा. राज्यमंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव, मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई ( प्रसिध्दीसाठी)
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया बिल्डींग, हुतात्मा चौक, मुंबई (पत्राने),
सर्व विभागीय आयुक्त,
आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
आयुक्त, समाज कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे,
आयुक्त, वि.जा.भ.ज.व इ.मा.व. संचालनालय, पुणे,
सर्व जिल्हाधिकारी,
आयुक्त, सर्व महानगर पालिका,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका,
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी,
सर्व समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,
कक्ष अधिकारी /आस्था-२, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग /विभागातील सर्व कार्यासने/
निवड नस्ती, का-अपंग कल्याण -२.